# धुळे महानगरपालिका धुळे

कार्यालय फोन (०२५६२) २८८३०१, फॅक्स नं.(०२५६२)२८८३०४
**Website** : www.dhulecorporation.org Email: dhulemc.nuhm@gmail.com

जा.क्र./धुमपा/आरोग्य/ जाहिरात / २३ /२०२४-२५ दिनांक:-३०/०७/२०२४

## जाहिरात

धुळे महानगरपालिका राष्ट्रीय किटक जन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु,चिकनगुन्या –डास नियंत्रण पर्यावरण व्यवस्थापणकरिता Breeding Checkers हि पदे २ महिन्यांकरिता हंगामी तत्वावर खालीलप्रमाणे भरावयाची आहेत.सदर पदाची शैक्षणिक अर्हता,पदसंख्या.तपशिल व अटी–शर्ती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | पदाचे नाव | डासोत्पत्ती स्थाने तपासनीस Breeding Checkers |
| २ | पद संख्या | २८ |
| ३ | शैक्षणिक अर्हता | या पदासाठी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ४ | वयोमर्यादा | किमान १८ वर्ष आणि कमाल ४३ वर्ष |
| ५ | मानधन | दैनिक भत्ता दररोज रु.४५०/- प्रमाणे किमान २५ दिवस दरमहा रु.११,२५०/- |
| ६ | कामाचे स्वरूप | दैनंदिन गृहभेट देऊन कंटेनर तपासणी करून अळीशोधणे Breeding Survey दररोज किमान २०० घरांची तपासणी करून दुषित भांडी रिकामी करणे,सर्वेक्षण करतांना सोबत १% डास अळी नाशक घेवून वापर करणे व इतर अनुषंगिक कामे |
| ७ | उमेदवारांसाठी विषय सूचना | सदरची नेमणूक ही निव्वळ हंगामी व तात्पुरता स्वरूपात असून सदर सेवेचा महानगरपालिकेशी संबंध असणार नाही.तसेच रु.१००/- मात्र च्या स्टंप पेपरवर विहित नमुन्यात करारपत्र करून द्यावे लागेल.तसेच या पदावर काम केलेल्या कर्मचारी आरोग्य सेवा (पु.) या पदावर भरतीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसाच्या कामकाजाचा अनुभव म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.किंवा उमेदवाराने केलेला कोणताही दावा मान्य केला जाणार नाही. |

**अटी व शर्ती :-**

१.सदरची पदे राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंकार्यक्रमातर्गत राहतील.सदर पदाची धुळे महानगरपालिका धुळे आस्थापनेशी कोणताही प्रकारचा संबध राहणार नाही. तसेच सदर पदाचे काम केलेल्या कोणाचाही अनुभव शासकीय नोकरीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२. सदरची पदे पूर्णपणे केवळ राष्ट्रीय किटक जन्य रोग नियंत्रण कार्यक्रम कामकाजासाठी तात्पुरता स्वरूपात भरावायची असल्याने अर्जदारास काल मर्यादा नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीस शिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल.

३.सदरच्या पदावरील नेमणुका या अत्यंत हंगामी स्वरूपाच्या असून उमेदवाराला कायम स्वरूपी हक्क सांगता येणार नाही असे हमी पत्र १०० रुपयांच्या स्टंप पेपरवर प्रमाणित करून नियुक्ती वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

४. सदरच्या पदावरील कर्मचारी यांनी महिन्यातून किमान २५ दिवस काम करणे आवश्यक आहे.

५.सदरच्या पदावरील कर्मचाऱ्याच्या नेमणुका या २९ दिवसांकरीता आहेत.त्यामुळे प्रत्येक २९ दिवसांनंतर या कर्मचाऱ्याच्या सेवेमध्ये ०१ दिवसांचा खंड करून त्यांना परत २९ दिवसांचे आदेश देण्यात येवून त्याचा एकूण सेवा कालावधी फक्त २.५ महिन्याचा असेल.

६. सदर पदावरील कर्मचाऱ्याना मानधन देताना त्यांनी एका महिन्यामध्ये साधारण २५ दिवस काम केले असल्यास २५ x ४५० रु.असे रु.११२५०/- असे एका महिन्याचे मानधन काढण्यात येईल.

७.सदर पदावरील कर्मचाऱ्याच्या हजेरीचा तसेच कामकाजाचा आढावा पर्यवेक्षका मार्फत घेवून मगच त्यांचे मानधन अदा करण्यात येईल.

८.सदर पदासाठी फक्त धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांचा अर्जाचा विचार केला जाईल. इतर अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी रहिवासी पुरावा (आधार कार्ड, मतदान ओळखपत्र,रेशन कार्ड छायांकित सत्यप्रत ) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

९. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्पा वर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त धुळे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

१०.प्रस्तुत जाहिराती मधील पदा करिता करावयाचा अर्जाचा नमुना जाहिराती सोबत महापालिका संकेतस्थळ www.dhulecorporation.org तसेच जुनी महानगरपालिका नोटीस बोर्डवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदरचा अर्ज उपलब्ध करून घेऊन उमेदवाराने सादर करणे अपेक्षित आहे.याकरिता महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र पणे अर्ज उपलब्ध करून दिला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

११.सदर जाहिरातीच्या अनुषंगाने गुनानुक्रम यादी तसेच अंतिम निवड यादी,नेमणूक आदेश,महापालिकेच्या संकेतस्थळ www.dhulecorporation.org तसेच जुनी महानगरपालिका नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करून केले जातील. ते संबधित उमेदवारांनी उपलब्ध करून घेऊन मुदतीत वैद्यकीय आरोग्य विभाग मुख्य कार्यालय धुळे महानगरपालिका येथे हजर व्हायचे आहे.याकरिता कोणत्याही उमेदवारास स्वतंत्रपणे पत्रव्यवहार,दुरध्वनी, मोबाईल अथवा एस.एम.एस.द्वारे संपर्क करण्यात येणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. दि.०१ /०८/२०२३ रोजी दिनांकास सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या वेळेत जेवढे उमेदवारांकडून हजेरी नोंदवून व त्याचे कडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील.त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाही.

१३.परिपूर्ण भरलेला अर्ज व पुढील आवश्यक कागदपत्रे जोडण्यात आलेले अर्ज पात्र होतील.अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कागदपत्रे :-**

१.इच्छुक व पात्र उमेदवारांनी महानगरपालिका संकेतस्थळ www.dhulecorporation.org व जुनी महानगरपालिका नोटीस बोर्डवर दिलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे व खालील कागद पत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात.(अर्जासोबत मूळ कागदपत्रे जोडू नये.)

२. इयत्ता १० उत्तीर्ण प्रमाणपत्र.

३.पासपोर्ट साईज फोटो.

४.जन्म तारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला).

५.रहिवासी दाखला किंवा आधार कार्ड,मतदान ओळखपत्र,रेशन कार्ड.

६.अनुभव दाखला.

७. बँक पासबुक.

आयुक्त तथा प्रशासक
धुळे शहर महानगरपलिका